
१८६५
म. ग्रं. सं. ठाणें
विषय भू प्रवास
सं. क्र. ५०२




REFBK-0015049

# जयजयरघुवीरसमर्थ

५७१-१
७५९७६
२२/३/७१
५०२

# जय जय रघुवीर समर्थ

सह्याद्रिगिरिचा विकास विलसे मंदारशृंगारपरी ।
नामें सज्जन जो नृपें वसविला श्रीऊर्वशीचे तिरीं ॥
साकेताधिपती कपी भगवती हे देव ज्याचे शिरीं ॥
तेथें जागत रामदास विलसे जो या जना उद्धरी ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. १५०४९

अमरेन्द्र

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय संपूर्ती योजना
१९७०

किंमत ६० पैसे

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ७५९७६ वि. जोग
क्रमांक ५०२ दि. २२/३/७१
REFBK-0015049

...ण्ड कंपनी पब्लिशर्स
...लिमिटेड, मुंबई २

श्री : ९७ : ३
[११-६५]

सांस्कृतिक महाराष्ट्र
दर्शन माला : २

© १९५८
वोरा अॅण्ड कंपनी
पब्लिशर्स प्रा. लि.

आवृत्ति तिसरी
१९६५

किंमत : ६० पैसे

महाराष्ट्रांतील सांस्कृतिक केन्द्रांचीं ऐतिहासिक पार्श्वभूमीवर रेखाटलेलीं भावरम्य आणि बोलकीं शब्दचित्रें.

प्रकाशक :
अ. ल. गाडगीळ
वोरा अॅण्ड कंपनी
पब्लि. प्रा. लि. करितां
३ राउंड बिल्डिंग,
काळबादेवी, मुंबई २

मुद्रक :
गं. शं. दाते
कलागृह छापखाना,
६६६ सदाशिव पेठ,
पुणें २

# सांस्कृतिक महाराष्ट्र दर्शन

महाराष्ट्रांतील सांस्कृतिक केंद्रांचीं भावरम्य आणि बोलकीं शब्दचित्रें. तेथील सर्व ऐतिहासिक पार्श्वभूमि; त्या त्या स्थानांतील महत्त्वाच्या मूर्तींचीं, स्थळांचीं सुरेख विश्वसनीय चित्रें; तेथें जाण्याचे रस्ते, तेथील उत्सव, दर दिवशींचे कार्यक्रम यांची माहिती देणारीं मार्गदर्शक पुस्तकें.

या पुस्तकांतील भावना फुलविणारा इतिहास आणि डोळसपणा देणारी माहिती वाचून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक दर्शनाचें समाधान अवश्य लाभेल.

- मोठा, जाड टाईप; सोपी भाषा आकर्षक मांडणी.
- हीं पुस्तकें म्हणजे घरबसल्या महाराष्ट्रांतील तीर्थ–यात्रा आणि संतदर्शनें; भाविक यात्रेकरूंना आणि चिकित्सक प्रवाशांनाहि मार्गदर्शक. शालेय सांस्कृतिक कार्यक्रमांना अति उपयुक्त.
- डायरेक्टर ऑफ एज्युकेशन यांचेकडून शालेय ग्रंथालयांसाठीं शिफारस.
- लोकशिक्षण समिति, महाराष्ट्र विभाग यांच्याकडून प्रौढ साक्षरांसाठीं पुरस्कृत.
- असिस्टंट क्युरेटर ऑफ लायब्ररींज, महाराष्ट्र विभाग यांनीं सार्वजनिक वाचनालयांकरितां विशेष शिफारस केलेली.


मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. ७५०८०




रामवरदायिनीनें कृपा केली. ‘ तुझा तूं वाढवी राजा । सीघ्र आम्हांचि देखतां ॥ ’ हें श्रीसमर्थ रामदासस्वामींचें ‘ एकचि मागणें ’ देवीनें पुरविलें. ‘ बुडाले सर्वही पापी । हिंदुस्थान बळावलें ॥ ’ ‘ सकळ जन सुखावे तो कसा काळ फावे । भजन जन उकावे तो कसा काळ पावे ॥ ’ ही समर्थांना बहुत काळ लागलेली चिंता बहुतांशीं दूर झाली. त्यांना ‘ स्वप्नीं जें देखिलें रात्रीं । तें तें तैसेंचि होतसे ॥ ’ असा अनुभव येऊं लागला. ‘ मोडलीं मांडलीं क्षेत्रें । आनंद वन भुवनीं ॥ ’ हें पाहून त्यांचें हृदय समाधानानें भरून आलें. – संपूर्ण कृतकृत्यतेचा नसला, तरी स्वराज्यसंस्थापना व स्वधर्मोद्धार या बाबतींत बरीच यशस्वी व अचूक वाटचाल झाल्याच्या समाधानाचा सुस्कारा शिव-समर्थांना टाकतां आला. असा तो काळ होता.

त्या सर्वदा स्मरणीय अशा ऐतिहासिक काळांतील ही एक सुखद स्मृति आहे. शिव-समर्थांच्या अकृत्रिम प्रेमाचें हें जितें जागतें स्मारक आहे. सज्जन सहवासानें सार्थनाम झालेली ही एक पवित्र वास्तु आहे.

● ● ●



स ज्ज न ग ड

## १. समर्थांचें गडावर आगमन

याचें नांव सज्जनगड. साताऱ्यापासून सहा मैलांवर परळी गांव लागतें. उरमोडी नदीच्या तीरावरील या गांवाच्या माथ्यापाशीं एका डोंगराचा पायथा येतो. या डोंगरावर उभा असलेला 'परळीचा गड' अनेक ऐतिहासिक घटनांचा साक्षीदार आहे. अनेक थोर प्रसंगांचा भागीदार आहे.

परळीचा किल्ला सकृद्दर्शनीं किरकोळ वाटला तरी त्याचें भौगोलिक महत्त्वहि मोठें दिसतें. चारी बाजूंनीं उंच उंच डोंगरांनीं वेढलेला हा गड आसमंतांत पसरलेल्या खोऱ्यांच्या मध्यभागीं एकाकी उभा आहे. जसा कांहीं आसपासच्या प्रदेशाचा पहारेकरी. येथून चौदिशांना नजर टाकल्यास असें दिसेल : ईशान्येला सहा मैलांवर साताऱ्याचा अजिमतारा किल्ला. पश्चिमेला खेड-चिपळूणकडचे कोंकणचे मार्ग. उत्तरेला प्रतापगड-रायगडच्या वाटा. चाफळचा जवळचा रस्ता येथून सहज पायाखालचा वाटण्यासारखा.

या किल्ल्याचें नामांतर व हस्तांतरहि अनेकदां झालेल आहे. 'आश्वलायनगडा'पासून 'अस्वलगडा'पर्यंत नामबदल होत होत हा 'परळीचा गड' झाला. हें मूळ अश्वलायन ऋषींचें आश्रमस्थान असल्याची दंतकथा 'आश्वलायनगडा'चा अर्थ सांगूं शकते. पुढें परळीच्या परिसरांतला म्हणून 'परळीचा गड' हें उघड झालें. त्यापुढचें नामकरण मात्र यथोचित व यथाविधि झालें तें – सज्जनगड.

'सज्जनगडा'वर श्रीसमर्थ आले असें नव्हे तर श्रीसमर्थ आल्यानंतर या 'परळीच्या गडा'चा 'सज्जनगड' झाला. तो
। :

शके १५९८ म्हणजे इ. स. १६७६ ष. शिवाजी महाराज अद्यापि छत्रपति व्हावयाचे होते. हिंदवी स्वराज्याची संस्थापना झाली होती, तथापि त्याच्या संस्थापकाला अजून रीतसर राज्याभिषेक व्हावयाचा होता. स्वराज्याचा व्याप वाढता होता. अर्थातच शिवाजी महाराजांच्या शिरावरील जबाबदाऱ्याहि वाढत्या प्रमाणावर होत्या. राजगुरु व राष्ट्रगुरु श्रीसमर्थ यांच्या भेटीची, सल्लामसलतीची, दर्शनसुखाची उत्कट इच्छा नि आवश्यकता असूनहि त्यांना वारंवार चाफळला जाऊन येणें कठीण होऊं लागलें होतें. म्हणून महाराजांनीं श्रीसमर्थांना विनंती केली कीं, आपण परळीच्या गडावर येऊन तेथेंच कायमचें वास्तव्य करावें. जिवाभावाच्या जिवलगानें केलेली ही प्रेमळ सूचना अमान्य करणें समर्थांच्याहि जिवावर आलें. आणि योजना स्वीकारली गेली.

महाराजांनीं श्रीसमर्थांना चाफळहून मोठ्या समारंभानें आणविलें. सजविलेल्या हत्तीवर श्रीसमर्थ बसले आणि कल्याणाकडेच त्याचें माहुतपण आलें. बरोबर सरदार दरकदार आणि शिष्य-

संप्रदायहि होताच. गडावर आपल्या गुरूसाठीं सोयिस्कर निवासस्थानाची व्यवस्था शिवरायांनीं अगोदरच केलेली होती. तथापि खास समर्थ-निवासासाठीं मोठी इमारत अशी बांधली जावयाची होती. गड सजविण्यांत आला होता; आणि सर्व प्रकारचा राजशाही थाट त्या वेळच्या स्वागत-समारंभांत प्रकट झालेला होता.



क ल्या ण स्वा मी

श्रीसमर्थ गडावर आले. शिवरायांना अति समाधान वाटलें.

लाविलें हुर्मुजी वसननिशाण । केलें नृपांनीं विध्युक्त पूजन ।
मेवामिठाया शर्करा वांटुन । संतोष केलें सकळातें ।।
कांहीं सुचेना सुवाद्यगजरीं । उलाटयंत्राचा आवाज भारी ।
श्रीराम प्रवेशतां अयोध्यापुरीं । जेवि सौख्य तेंवि माना ।।
कारकून लोकां बोलाउन । परळी गडाचें नामाभिधान ।
सज्जनगड ऐसें लिव्हाउन । गुरुसि वंदन केला नृपें ।।

असें वर्णन 'श्रीदासविश्रामधाम'कारांनीं केलें आहे.

श्रीसमर्थ सज्जनगडीं येऊन राहिले. त्यानंतर लगेच त्यांनीं शिवरायाकरवीं तत्कालीन साऱ्या संत-सत्पुरुषांना गडावर येण्याचें पाचारण केलें. त्या काळची सारी व खरी थोर संतमंडळी त्या वेळीं गडावर जमली होती. राजकारणीहि उपस्थित होते. 'महाराष्ट्रांतली पहिली संतपरिषद' असें समर्थभक्त कै. शंकर श्रीकृष्ण देवांनीं तिचें यथार्थ वर्णन केलें आहे.

या संत-सोहळ्याचें अपूर्व दृश्य ज्यांनीं पाहिलें नि ज्यांनीं तो अमृतानुभव जाणीवपूर्वक अनुभविला ते धन्य ! या प्रसंगाच्या निमित्तानें सर्वांचीं कीर्तनें झालीं. प्रत्यक्ष शिवाजी महाराजांनीं कीर्तन केलें :

महाराज गरीब नवाज । अजिहो महाराज गरीब नवाज ॥ ध्रु. ॥
सेवक होकर सेवा मंगो । इतना साहेब काज ॥ १ ॥
बंदा कमीन हीन में साहेब । रखो मेरी लाज ॥ २ ॥
छत्रपति तुज शेखदार । शिव रखे हमारी लाज ॥ ३ ॥

स्वतः श्रीसमर्थांच्या कीर्तनानें सुमारें महिनाभर चाललेल्या या संत-सभेचा समारोप झाला. आणि तेव्हांपासून गड समर्थ-भक्तांना मुक्तद्वार झाला. तेथील नित्याचे सैनिकी निर्बंध दूर होऊ तो परमार्थसाधनेचा सोपान बनला.

श्रीसमर्थ आणि त्यांची शिष्यमंडळी गडावर रहाण्यास आली तेव्हां मठ बांधून झालेला नव्हता. प्रशस्त ओवऱ्यांतून त्यांनीं मुक्काम केला. शिवाजी महाराजांनीं दोन हजार होन खर्चून आपल्या गुरूसाठीं ‘ नूतन इमारत ’ बांधावयास घेतली होती ती पुढें शके १६०३ मध्यें पुरी झाली. श्रीसमर्थ त्याच वर्षीं वैशाख महिन्यांत या नूतन इमारतींत जाऊन राहिले. आज गडावर ‘ मठ ’ म्हणून जो ओळखला जातो तीच ही ‘ नूतन ’ इमारत.

शके १५९८ ( सन १६७६ ) मध्यें समर्थ गडावर रहावयास आले. तेव्हांपासून पुढील सुमारें पांच-सहा वर्षांच्या काळांतील बरेंचसें समर्थचरित्र येथेंच घडलेलें आहे. कारण त्यांनीं शिवरायांना आश्वासिल्याप्रमाणें पुढें तेथेंच कायम वास्तव्य केलें. प्रतिवर्षीं रामनवमीच्या उत्सवासाठीं मात्र ते चाफळला जाऊन रहात.

त्या वेळीं गडावर समर्थांपाशीं शिष्य आणि सेवेकरी मिळून निदान पंचवीस मंडळी तरी असतच. दर्शनार्थ आल्या-गेल्यांचीहि

वर्दळ वाढत होतीच. यासाठीं गडावर सामानसुमान पुरविण्याची व्यवस्था शिवाजी राजांनीं केलेली होती. समर्थांच्या सुखसोयींकडे राजांचें अत्यंत बारकाईनें लक्ष असे. गडावर पाऊस बेसुमार व हिंवाळ्याचा कडाकाहि मोठा. यासाठीं समर्थांजवळ उबेकरितां शेगडी ठेवण्यांत यावी व तिला दररोज पांच शेर कोळसे पुरवावेत असा सातारच्या देशाधिकाऱ्यांना राजांचा हुकूम होता. असा होता त्यांचा समर्थांबद्दलचा जिव्हाळा !

रायगडीं राज्याभिषेक करून घेण्यापूर्वी शिवाजी महाराज चाफळला समर्थांच्या दर्शनासाठीं ( शके १५९६ ) गेले होते. तेथें त्यांनीं समर्थांना राजचिन्हें अर्पण केलीं होतीं. त्यानंतर समर्थांची वस्ती सज्जनगडावर झाली. महाराजांना राज्याभिषेक होऊन त्यांनीं छत्रपतिपद धारण केल्यानंतर ते सज्जनगडावर समर्थांच्या भेटीसाठीं आले ते सहकुटुंब सहपरिवार आले. त्या वेळीं त्यांचा मुक्काम तेथें जवळ जवळ दीड महिना होता. राण्या, संभाजी-राजाराम हीं मुलें आणि अष्टप्रधानहि या मुक्कामांत त्यांच्यापाशीं सज्जनगडावर होते. मात्र गडावर असतांना – म्हणजे समर्थांच्या सान्निध्यांत असतांना – महाराज राजचिन्हें धारण करीत नसत; तीं त्यांनीं चाफळलाच गुरुचरणीं वाहिलीं होतीं.

‘ जीव जीवांत घालावा । आत्मा आत्म्यांत मिसळावा । ’ तसें प्रेम शिव-समर्थांचें परस्परांवर जडलेलें होतें. याचीं अनेक प्रत्यंतरें सज्जनगडानें पाहिलेलीं आहेत. शके १६०१ ( स. १६७९ ) च्या पौष शुद्ध नवमीस महाराज सज्जनगडावर समर्थदर्शनासाठीं आले ते माघी पौर्णिमेपर्यंत तेथेंच राहिले. “ समर्थांनीं निरोप देतेसमयीं अनेक प्रकारच्या राजधानीसंबंधें सांगोन अध्यात्मपर विषयही श्रीनीं सांगितला. तीन दिवस समाधी लागोन राजश्री बसले होते. ” या पौर्णिमेला महाराज समर्थांचा निरोप घेऊन गेले तो अखेरचाच !

या प्रसंगीं समर्थांनीं महाराजांचा काळ समीप आल्याचें सुचविलें होतें असा उल्लेख आहे. 'आजपासून साठ दिवसांचा अवकाश आहे' असें समर्थांनीं उद्धवाला सांगितल्याचा उल्लेख वांकेनिशींत आहे. – समीप आलेल्या अन्तकाळाची जाणीव उभय-तांना, निदान समर्थांना तरी, असतांना झालेला हा शेवटचा निरोपाचा प्रसंग खरोखरीच किती हृदयस्पर्शी असेल !

• • •

## २. शिवछत्रपतींच्या पश्चात्

पुढें दोनच महिन्यांनीं शके १६०२ (सन १६८०) च्या चैत्र पौर्णिमेला शिवछत्रपतींनीं इहलोकींची यात्रा संपविली. साऱ्या देशावर हा वज्राघात झाला. हें दुःखद वृत्त समर्थांच्या कानीं पडतांच "श्रींची इच्छा" एवढेच शब्द त्यांच्या तोंडून आले. तेव्हांपासून त्यांनीं आपल्या खोलींतच स्वतःला कोंडून घेतलें. बाहेर फिरणें सोडून दिलें. फक्त दूध घेऊन बाकी अन्न वर्ज्य केलें. आणि अत्यंत उदास-वृत्ति धारण केली. जाणत्या शिष्यांना कळून चुकलें कीं, "समर्थांचा अवतार केवळ राजश्री-(शिवाजी महाराज) करितांच होता. आतां तेहि लवकरच समाप्त होतील."

शिवछत्रपतींच्या परलोकवासानंतर संभाजी महाराज रामचंद्र-पंत अमात्यांसह गडावर समर्थांच्या दर्शनासाठीं आले होते. त्यांच्या राज्याभिषेकाचें निमंत्रणहि समर्थांना आलें होतें; परंतु 'आपणास येणें होत नाहीं' असें कळवून त्यांनीं दिवाकर गोसावी यांना तिकडे पाठविलें.

पुढील वर्षीं म्हणजे शके १६०३ मधील रामनवमीला समर्थ चाफळ येथें रामनवमीच्या उत्सवाकरितां गेले होते. हनुमानजयंती-पर्यंत ते तेथेंच होते. तेथून निघतांना त्यांनीं स्वहस्तें उभारलेल्या त्या

राममंदिरांतील रामरायांचा अखेरचा निरोप घेतला. रामाला त्या वेळीं त्यांनीं प्रार्थना केली आहे : "हा देह उत्पन्न करून सेवा केली ते घेतली. पुढें जे आपली सेवा करतील त्यांचें कल्याण व्हावें."

चाफळहून परतल्यावर गडावरील 'नूतन' इमारतींत समर्थ राहूं लागले. याच वर्षीं मार्गशीर्ष महिन्यांत कल्याणस्वामी डोमगांवाहून दर्शनाला आले, तेव्हां समर्थांनीं 'दासबोधा'चा विसावा दशक कल्याणांच्या हस्तें लिहवून पुरा केला, असा हणमंतस्वामींच्या बखरींत उल्लेख आहे. नंतर कल्याण परत गेले; परंतु त्यांना याची कल्पनाहि नसेल कीं, आपल्या गुरुमाउलीची ही अखेरचीच भेट !

शिवाजी महाराजांच्या निधनामुळें समर्थ मनस्वी उदास झाले होतेच; त्यांत भर पडली ती संभाजी महाराजांच्या स्वराज्यघातकी स्वैर वर्तनानें. स्वराज्याचे एकेक आधारस्तंभ संभाजीनें क्रूरपणानें नष्ट करण्याचा सपाटा चालविलेला पाहून समर्थांना अति उद्वेग आला. 'कालमाहात्म्याला उपाय नाहीं' असें त्यांनीं समाधानहि करून घेतलें. तथापि संभाजीला दोन उपदेशाच्या गोष्टी सांगवल्याशिवाय त्यांना राहवलें नाहीं. पौष महिन्यांत त्यांनीं संभाजीला एक पत्र पाठविलें. त्यांत त्यांनीं लिहिलें आहे :

अखंड सावधान असावें । दुश्चित कदापि नसावें ।
तजवीजा करीत जावें । एकान्त स्थळीं ॥ १ ॥
श्रेष्ठीं जें जें मेळविलें । त्यासाठीं भांडत बसलें ।
मग जाणावें फावलें । गनीमासी ॥ २ ॥
ऐसें सहसा करूं नये । दोघे भांडतां तिसऱ्यास फावे ।
धीर धरूनि महत्कार्य । समजून करावें ॥ ३ ॥

.... .... ... ....

आहे तितुकें जतन करावें । पुढें आणीक मेळवावें ।
महाराष्ट्र राज्य करावें । जिकडे तिकडे ॥ १० ॥

—इतकें सांगून त्याच्या प्रभावी पित्याच्या पुण्यप्रतापाची आठवणहि त्याला समर्थांनीं करून दिली आहे :

शिवराजास आठवावें । जीवित्व तृणवत मानावें ।
इहलोकीं परलोकीं राहावें । कीर्तिरूपें ॥ १२ ॥

आणि शेवटीं सांगितलें :

सकळ सुखाचा त्याग । करुनि साधिजे तो योग ।
राज्यसाधनाची लगबग । केली पाहिजे ॥ १९ ॥
त्याहूनि करावें विशेष । तरीच म्हणावें पुरुष ।
याउपरी आतां विशेष । काये लिहावें ॥ २० ॥

हा उपदेश संभाजीनें ऐकला नाहीं; त्याचा परिणाम स्वराज्य-मंदिराला सुरुंग लागण्यांत झाला. या उपदेशाकडे आपलें दुर्लक्ष झालें; परिणामीं लाजिरवाण्या जिण्याची मिरास आपल्या कपाळीं आली !

माघ महिन्याच्या प्रारंभालाच समर्थांची प्रकृति काळजी करण्याइतकी बिघडली. उद्धव आणि आक्का या दोघांखेरीज त्यांच्या निजण्या—बसण्याच्या खोलींत सहसा कोणाला प्रवेश मिळेनासा झाला. सज्जनगडावर गारठा फार, तेव्हां चाफळला जाऊन रहावें असा आग्रह शिष्यमंडळी करूं लागली. तेव्हां—

" जेथें होईल हो प्रांत । तेथें भजतील हो भक्त ।
उत्सव चाफळीं बहुत । राहील तेव्हां ॥
म्हणूनि सज्जनगडीं वास । आम्हांस करणें सावकाश ॥
जें होईल देहास । तें घडो येथें ॥ "

असें उत्तर समर्थांनीं दिलें. ' चाफळला देह पडला तर तेथें यात्रा जमून आपली प्रतिष्ठा वाढून रामरायाकडे दुर्लक्ष होईल, तें आपल्याला खपण्यासारखें नाहीं. ' म्हणून त्यांनीं हवा बदलण्याला नकार दिला. इतकेंच नव्हे, तर औषधपाणी घेण्यास किंवा प्रकृतीस आराम पडण्या-साठीं अनुष्ठान करविण्यालाहि समर्थांनीं परवानगी दिली नाहीं. याचा

अर्थ आतां अधिक काल हा देह धारण करावयाचा नाहीं, असाच त्यांचा निश्चय झाला असावा.

निरवानिरवीची भाषा सुरू झाली. ‘ मठांतील पूजा, उत्सव इत्यादींसंबंधीं कांहीं व्यवस्था करावी ’ अशी निकड प्रमुख शिष्यांनीं समर्थांच्या मागें लावली. त्यावर समर्थांनीं उत्तर दिलें : “ शिष्य-मंडळींच्या द्वारें संप्रदाय वाढला आहे. त्यांत जो सेवा करील त्यावर श्री कृपा करतील. ” परंतु यानेंहि शिष्यमंडळींचें समाधान होईना. तेव्हां समर्थ इतकेंच उद्गारले :

“ आमुची प्रतिज्ञा ऐसी । कांहीं न मागावें शिष्यासी ।
आपणामागें जगदीशासी । भजत जावें ॥”

शेवटीं, जांबेहून श्रेष्ठांचीं मुलें आणवून संस्थान त्यांच्या स्वाधीन करावें व त्यांच्या आज्ञेप्रमाणें उत्सवादि चालवावींत, अशी व्यवस्था समर्थांनीं सांगितली. तथापि पुढील व्यवस्थेविषयीं ते फारसे उत्सुक नव्हते, किंबहुना उदासीन होते, हें चाफळ शेवटच्या प्रसंगीं सोडतांनाच त्यांनीं दिलेल्या उत्तरावरून दिसत होतें.

समर्थांची प्रकृति दिवसेंदिवस खालावत चालली. माघ शुद्ध षष्ठीला शिष्यांसमवेत बसले असतां समर्थ म्हणाले :

रविकुलटिळकाचा वेळ सन्नीध आला ।
तदुपरि भजनाशीं पाहिजे सांग केला ॥

लगेच उद्धवांनीं श्लोक पूर्ण केला :

अनुदिनि नवमी हे मानसीं आठवावी ।
बहुत लगबगीनें कार्यसिद्धि करावी ॥

याचा अर्थ नवमी ही निर्याणाची तिथि अगाऊच निश्चित झाल्या-सारखी होती.

याच दिवसांत एक महत्त्वाची घटना घडली. पूर्वी समर्थ व्यंकोजी राजांच्या निमंत्रणावरून तंजावरास गेले असतां तेथें त्यांनीं

राम, लक्ष्मण, सीता व मारुति अशा चार मूर्ति करविण्याबद्दल आज्ञा केली होती. त्या मूर्ति माघ वद्य पंचमीलाच गडावर येऊन पोहों-चल्या. समर्थांची निजण्याबसण्याची मठांतील जी जागा त्या ठिका-णींच या मूर्ति एका उंच सिंहासनावर ठेवण्यांत आल्या. लगेच त्याच मध्यरात्रीं समर्थांनीं मूर्तींच्या नेत्रांवरील मेण काढविलें आणि मूर्ति पाहून समाधान व्यक्त केलें. त्यांनीं सांगितल्याप्रमाणेंच त्या मूर्तींचें ध्यान होतें. तेथेंच शेजघरांत मूर्तींची स्थापना करून त्यांची पूजा-अर्चा समर्थांनीं करविली; आणि सांगितलें कीं, “ या मूर्तींचें जे पूजन व अर्चन करतील त्याजवर श्री कृपा करतील. ”

• • •

## ३. ‘ जाहला अवतार हो पूर्ण ’

अखेर वद्य नवमी उजाडली. गेले नऊ दिवस अन्न तर नव्हतेंच पण पाण्याचा घोटहि समर्थांनीं घेतला नव्हता. प्रातःकाळींच श्रीरामचंद्रांना साष्टांग नमस्कार घालून सम्मुख दिगंबर होऊन समर्थ भूमीवर बसले. ही महाप्रयाणाची तयारी आहे हें सर्वांनीं ओळखलें. तत्त्वज्ञान कितीहि शिकलें तरी मनुष्यस्वभाव आपला प्रभाव दाख-वितोच. त्यांच्या सतत सहवासांत असलेल्या आक्कांच्या डोळ्यांतूनहि विरहाच्या कल्पनेनें अश्रुपात सुरू झाला. तेव्हां समर्थांनीं शेवटची उपदेशवाणी उच्चारली :

‘ माझी काया आणि वाणी । गेली म्हणाल अन्तःकरणीं ।<br>
परी मी आहें जगज्जीवनीं । निरंतर ॥<br>
आत्माराम दासबोध । माझें स्वरूप स्वतःसिद्ध ।<br>
असतां न करावा हो खेद । भक्तजनीं ॥ ”

आणि अखेर – आक्का सन्निध होत्या. शिष्य– भक्तमंडळी बाहेर श्वास रोधून उभी होती. ऐन माध्यान्हाचा समय होता. तेव्हां –

तीन वेळां स्मरण केलें । अंबर अवघें गर्जिनलें ।
रामनामें कोंदाटलें । जिकडे तिकडे ।
मुहूर्त एक हो गर्जना । गगनीं कोंदाटिलें हो जाणा ।
विस्मय पावलों निजजना । प्रेम आलें ॥
ध्वनी जाली संपूर्ण । जाहला अवतार हो पूर्ण ।
देशोदेशीं भक्तजन । जाते जाले ॥

असा हा समर्थांचा अवतार सज्जनगडावर शके १६०३ (सन १६८१) च्या माघ वद्य नवमीला पूर्ण झाला.

मठाच्या उत्तरेला एक मोठा खळगा होता तो भरून काढावा म्हणून शिवाजी महाराजांनीं योजिलें असतां " पुढें उपयोगी पडेल " म्हणून समर्थांनीं तो तसाच राहूं दिला होता. त्यांतच त्यांच्या भौतिक देहाचें दहन करण्यांत आलें.

समर्थांनीं समाधि घेतल्याचें कळतांच संभाजीनें रामचंद्रपंत अमात्यांना पुष्कळ द्रव्य देऊन गडावर पाठविलें. त्यांनीं उद्धवांच्या हातींच समर्थांचें उत्तरकार्य करविलें. दहनस्थळीं समाधि बांधून तेथें चंदनाच्या पादुकांची स्थापना करविली. पुढें शिष्यमंडळींनीं समर्थ-समाधीवर एक लहानसें देऊळ बांधून त्यांत तंजावराहून आणविलेल्या मूर्तींची स्थापना केली. तदनंतर कांहीं दिवसानीं स्वतः संभाजी महाराज अमात्यांसह गडावर समाधीच्या दर्शनासाठीं आले असतां त्यांनीं समाधीसुद्धां मोठें देऊळ बांधण्याची आज्ञा केली. त्याप्रमाणें अवघ्या दोन महिन्यांत देऊळ उभेंहि झालें. मठाच्या खर्चासाठीं द्रव्याची योजनाहि त्यांनीं लगेच करून दिली.

चाफळचें संस्थान श्रेष्ठांच्या मुलांना आणून त्यांच्या हातीं देण्याबद्दल समर्थांची आज्ञा झाली होती; परंतु तो काळ औरंगजेबाच्या दक्षिणेंतील स्वारीचा असल्यानें सर्वत्र धामधूम चालू होती. तशांतच शके १६१० मध्यें संभाजी महाराजांचा क्रूर वध झाला. राजमाता

येसूबाई आणि बालराजे शाहू यांना पकडून मोगलांनीं दिल्लीला नेलें. रायगडच्या वेढ्यांतून निसटून राजाराम महाराज शके १६११ मध्यें गडावर येऊन दर्शन घेऊन जिंजीकडे निघून गेले. आणि मग इतर भागांप्रमाणेंच साताऱ्याच्या टापूंतहि मोगली सैन्य धुडगूस घालूं लागलें.

सन १७०० च्या एप्रिल महिन्यांत साताऱ्याचा अजिमतारा किल्ला मोगलांच्या हातीं पडला. लगोलग मोगलांची टोळधाड सज्जनगडावर आली. त्या वेळीं परशुराम त्रिंबक हा किल्ला लढवीत होता. स्वतः औरंगजेबानें ३० एप्रिलला परळीला येऊन तळ दिला; आणि गडाच्या महाद्वारावर स्वतःच्या नेतृत्वाखालीं निकराचा हल्ला चढविला. पण तो भिकाजी जाधव व गोविंद महादेव गोडबोले या दोघां सरदारांनीं तितकाच तीव्र प्रतिकार करून परतविला. तथापि किल्ला फार काळ अशा रीतीनें टिकाव धरूं शकेल असें दिसेना. तेव्हां परशुराम त्र्यंबकानें श्रीरामाची व इतर मूर्ति घेऊन वासोटा किल्ल्याकडे प्रयाण केलें. त्याच्याबरोबर उद्धव गोसावी होते. तेथून निघण्यापूर्वीं त्यांनीं समाधीचें दार बेमालूम चिणून टाकलें व तेथें एक मारुतीची मूर्ति बसविली.

अपेक्षेप्रमाणें मोगलांचा जोर वाढतच होता. हल्ल्यावर हल्ले सुरू झाले. भयंकर रणधुमाळी माजली. गड सतत दोन महिने झुंजविला जात होता. अखेर गडावरील अन्नसामग्रीहि संपुष्टांत आली. तेव्हां अमात्यांच्या आज्ञेनें बादशहाकडून मोठी रक्कम घेऊन किल्ला मोगलांच्या स्वाधीन करण्यांत आला. स्वतः बादशहा गडावर आला व त्यानें आपल्या पद्धतीप्रमाणें गडाचें आणखी एक नामकरण केलें — ‘नवरसतारा’. अर्थातच तो तेथील राममंदिर जमीनदोस्त करावयास विसरला नाहीं. समाधीचें दार चिणलें असल्यामुळें ती मात्र त्याच्या तावडींतून सुरक्षित राहिली.

परंतु जून महिन्यांत पावसानें मोगली सैन्य झोडपण्यास सुरुवात केली. सैन्याचे हाल होऊं लागले. तेव्हां औरंगजेब परळीहून भूषणगडाकडे जाण्यास निघाला. वाटेंत उरमोडी नदीच्या पुरांत कित्येक मोगली सैन्य वाहून गेलें. आणि औरंगजेबाची परळीकडे पाठ होते तोंच परशुराम त्र्यंबकानें गड परत जिंकून घेऊन 'नवरसताऱ्यां'-तील सारा कुश्चिळ रस काढून टाकून त्याचा पुनश्च 'सज्जनगड' बनविला रामाच्या व इतर मूर्ति वासोटयाहून परत आणून नव्यानें बांधविलेल्या मंदिरांत सुप्रतिष्ठित केल्या.

औरंगजेब सातारा मुलखांत आला तेव्हांच सज्जनगडाप्रमाणें चाफळच्या श्रीरामादिकांच्या मूर्तीहि वाघापूरच्या सड्यावर नेऊन तेथें उत्सव केला जात असे. पुढें महाराष्ट्र-मंडळानें मोगलांना खडे चारले; राजाराम महाराज जिंजीहून महाराष्ट्रांत परत आले; तेव्हां वाघापूरच्या सड्यावरील मूर्ति चाफळला परत आणवून पूर्वीप्रमाणें मठाचें काम चालविण्यास उद्धव गोसावी यांना राजाराम महाराजांनीं सांगितलें. तसेंच समर्थांच्या आज्ञेप्रमाणें जांबेहून श्रेष्ठांचे चिरंजीव रामचंद्रबुवा यांस आणविण्याची व्यवस्था सांगून ते मोहिमेवर निघून गेले. परंतु दुर्दैवानें राजाराम महाराज लवकरच सिंहगडावर निधन पावले आणि तिकडे जांबेंत रामचंद्रबुवांचाहि देहान्त झाला. त्यामुळें ती गोष्ट त्या वेळीं तशीच राहून गेली.

शके १६२९ त शाहू राजांची दिल्लीहून सुटका होऊन ते साताऱ्याला आले आणि राज्यावर बसले. तेव्हां त्यांनीं सज्जनगडावर जाऊन समर्थसमाधीचें दर्शन घेतलें आणि चाफळलाहि जाऊन तेथील पूजेअर्चेची व उत्सवादिकाची व्यवस्था पूर्ववत् चालू केली. नंतर त्यांनीं जांबेहून रामचंद्रबुवांचे ज्येष्ठ चिरंजीव गंगाधरबुवा आणि श्यामजी (दादाजीबुवा) यांस सन्मानानें आणविलें. माहुली मुक्कामीं त्यांचें स्वतः जाऊन दर्शन घेतलें. आणि शके १६३२

माघ शुद्ध पंचमीला त्या उभयतांना सज्जनगडावर पाठविलें. त्यांच्या-बरोबर पंतप्रधान व पंतप्रतिनिधि लवाजम्यानिशीं देऊन शाहू महाराजांनीं त्यांचा मोठा सत्कार केला. त्याच्या तिसरे दिवशीं स्वतः शाहू महाराज सज्जनगडावर आले. तेव्हां उद्धव गोसावी बोलले कीं, “ मुलें अज्ञान आहेत, मठाचा अभिमान महाराजांस असावा. ” तेव्हां शाहू महाराजांनीं उत्तर दिलें तें त्यांच्या कुलपरंपरेला साजेसेंच होतें. ते म्हणाले, “ राज्य त्यांचेंच आहे.” त्यांनीं तेथील मठाची व्यवस्था पूर्वीप्रमाणें चालू ठेवण्यास खंडो बल्लाळ चिटणिसांना आज्ञा केली.

श्रीसमर्थांच्या पश्चात् चाफळ व सज्जनगड येथील कारभाराचा भार उद्धव गोसावी व आक्का – विशेषतः आक्का यांच्यावरच होता. यांपैकीं उद्धव गोसावी यांनीं शके १६३२ च्या फाल्गुन वद्य प्रतिपदेला इहलोक संपविला. आक्कांनीं सतत ४० वर्षें मठाचा कारभार व उत्सवांचा व्याप मोठ्या कर्तबगारीनें सांभाळला. शके १६४३ त त्यांनींहि परलोकीं गमन केल्यानंतर पुढें तेरा वर्षेंपर्यंत गंगाधरस्वामी ह मठाचा कारभार करीत होते. शके १६५३त त्यांनीं देह ठेवल्यावर त्यांना पुत्रसंतती नसल्यामुळें त्यांच्या धाकट्या बंधूंचे चिरंजीव लक्ष्मणबुवा यांना लक्ष्मण गंगाधर या नांवानें मठाधिपति करण्यांत आलें. यांचेच चिरंजीव प्रसिद्ध समर्थ–बखरकार हणमंतस्वामी हे होत.

हणमंतस्वामींनीं शके १७०५ ते १७४० पर्यंत चाफळचे मठपती म्हणून काम केलें. त्यापुढील परंपरा अशी : महारुद्रस्वामी, लक्ष्मणस्वामी ( दत्तक ), गंगाधरस्वामी, आबास्वामी.

• • •

## ४. गडावरील वास्तु व वस्तु

सज्जनगडाचा सारा भव्य, अद्भुत आणि तितकाच स्पृहणीय व स्मरणीय इतिहासाचा चित्रपट स्मृतिचक्षूंसमोरून सरकत असतांना आपण वर्तमानकाळांत येऊन पोहोंचलों आहोंत.


साताऱ्याहून एस्. टी. मोटारीनें परळीला येऊन पोहोंचल्यावर पायथ्याशीं परळीच्या राममंदिरांत, वाटल्यास श्री. काळेबुवा यांचा थोडा पाहुणचार घ्यावयास हरकत नाहीं. येथून गडाची म्हणजे डोंगराची चढण सुमारें दीड मैल आहे. यांपैकीं जवळ जवळ सबंध रस्त्यावर समर्थ सेवा मंडळानें पायऱ्या बांधल्या आहेत. वाटेंत ठिक-ठिकाणीं विश्रांतिकुट्याहि उभारल्या आहेत.

सुमारें डोंगर दोनतृतीयांश चढून गेल्यावर डाव्या हाताला प्रथमच देऊळ लागतें तें कल्याणांचें स्मृतिमंदिर. समर्थांची छाटी वाऱ्यानें उडाली ती धरण्यासाठीं कड्यावरून त्यांनीं उडी घेतल्याची – त्यांच्या दणकट नि बळकट गुरुभक्तीला सर्वस्वीं शोभण्यासारखी – ही खूण. अर्थातच हें स्मृतिमंदिर आधुनिक असून समर्थ सेवा मंडळानें तें बांधलें आहे. या ठिकाणीं कल्याणांचें भव्य दर्शन घडतें. समर्थदर्शनाला जातांना प्रथम पट्टशिष्याची भेट ही उचित व अनुकूल समजली पाहिजे. येथूनच वर नजर टाकली तर रामघळीची जागा दिसूं शकते. समर्थ–वास्तव्यानें पुनीत झालेली ही घळ आंत चांगलीं दोन–तीन माणसें ऐसपैस बसतील इतकी प्रशस्त आहे.

कल्याणांच्या स्मृतिमंदिरावरून पुढें निघालें कीं किल्ल्याच्या तटाखालीं डाव्या बाजूला मारुति व उजव्या बाजूला सवत्स धेनु अशीं छोटीं देवळें दिसतात. सवत्स धेनूचें स्वतंत्र मंदिर हा थोडी कुतूहलाचीच गोष्ट वाटते.

पूर्वद्वारांत येऊन उभें राहिल्यावर आंत शिरतांना साहजिकच 'जय जय रघुवीर समर्थ' अशी गर्जना मुखांतून निघाल्यावांचून रहात नाहीं.


जेणें फेडिला पांग ब्रह्मादिकांचा। बळें तोडिला बंध त्या त्रीदशांचा।
म्हणोनी कथा थोर या राघवाची। जनीं ऐकतां शांत होते भवाची॥



सज्जनगडाचा पूर्व-दरवाजा

श्रीसमर्थांनीं रामाचा जयजयकार केला नि करविला तो यासाठीं. समर्थ-संप्रदायाचें राम-दैवत जें आहे तें 'रघुवीर' आहे. हा रघु-कुलांतील रावणान्तकवीर समर्थ आहे. त्याचा हा जयजयकार. या उद्घोषाच्या निनादांत गुंग असतांनाच या लढाऊ वास्तूंत आपण प्रवेश करीत असतों. महाराष्ट्रांत अनेक संत-स्थानें नि तीर्थ-क्षेत्रें आहेत; परंतु किल्ल्यासारख्या लढाऊ वास्तूंत ज्यानें चिरशांति घेतली असा परमार्थाच्याहि अत्युच्च कोटीला पोहोंचलेला दुसरा संत दिसत नाहीं; कीं किल्ल्यांत वसलेलें असें एखादें तीर्थ-क्षेत्रहि डोळ्यांपुढें चटकन येत नाहीं. श्रीसमर्थांच्या वैशिष्ट्याची जाणीव जाणत्या मनाला खरी या पूर्व-द्वारांतून आंत शिरत असतांनाच व्हावयास हरकत नाहीं.

यानंतर लागतो तो महादरवाजा. आंत शिरतांच दोहों बाजूंना पहारेकऱ्यांच्या प्रशस्त देवड्या दिसतात. आतां गडावर जुने पहारेकरी नाहींत, म्हणूनच कीं काय समर्थ संप्रदायाला ललामभूत झालेले भगवान् श्रीमत् परमहंस परिव्राजकाचार्य श्रीधरस्वामी महाराज यांनीं अनुक्रमें डाव्या-उजव्या बाजूंना वराह व हनुमान यांची स्थापना गडरक्षणार्थ केली आहे.



महाद्वार

येथून उजव्या हाताला वळतांच समोर भिंतींत एक फारसी शिलालेख दिसेल. त्याचा प्रारंभच – " ऐश्वर्य तुझ्या दारांतून डोकावत आहे " अशा अर्थाचा आहे. मग डाव्या हाताला वळलें कीं, समोर गडावरील मुख्य इमारतीकडे जाण्याचा सरळ रस्ता लागतो; परंतु असें एकदम सरळ न जातां – कांहीं सांप्रदायिकांच्या रिवाजाप्रमाणें – डाव्या हाताच्या बुरजापाशीं असलेल्या आंग्लाईच्या दर्शनास जाऊन येतां येईल.

हें आंग्लाईचें जुनें मंदिर स्वतः समर्थांच्या हातचें. अलीकडेच मोडकळीस आल्यानें समर्थ सेवा मंडळानें त्याचा जीर्णोद्धार केला आहे. मंदिरांतील आंग्लाईची मूर्ति मोठी सुबक दिसते. अंगापूरच्या डोहांत रामाच्या मूर्तीबरोबरच ( चाफळच्या मंदिरांत स्थापिलेल्या ) ही रामवरदायिनीची मूर्ति समर्थांना सांपडली. म्हणून तिचे नांव आंग्लाई. या मूर्तीचें ध्यान महिषासुरमर्दिनीचें असून ती सायुध व चतुर्भुज आहे. तिनें वरच्या डाव्या हातानें महिषाची जीभ हांसडून धरली आहे. महिष बसलेला असून देवीनें आपला डावा पाय त्याच्यावर रोवलेला आहे.

आंग्लाईचें हें मंदिर समर्थांचें मोठें आवडतें असलें पाहिजे. तिच्या सान्निध्यांत ते विचार करीत बसत असत असें दिसतें.

१५०४८

कारण देवळाच्या आंतल्या अंगाला त्यांचा बसण्याचा ओटा आहे. या देवळाच्या समोरील बुरूज हेंच गडावरील सर्वांत उंच स्थान. येथून समोरचें उघडें खोरें मोठें रमणीय दिसतें. समर्थ येथें येऊन समाजहिताची चिंता करीत कित्येक दिवस बसले असतील यांत कांहीं शंका वाटत नाहीं.

आंग्लाईचें दर्शन घेऊन परत मुख्य रस्त्यावर आलें कीं, उजव्या हाताला दोन कबरी दिसतात. समर्थांचें शिष्यत्व पत्करलेले हे दोघे मुसलमान होते. समर्थांच्या हयातींत ते वारले आणि त्यांच्या कबरी येथें झाल्या. याच्या शेजारींच असलेल्या तळ्याला 'मुक्काम-तळें' म्हणतात. पण तें फारसें वापरांत नाहीं.

पायऱ्या चढून जातांच समोर मठाचा दरवाजा दिसूं लागतो. पण तिकडे जाण्यापूर्वीं उजव्या हाताला दिसणाऱ्या मारुतिरायांचें दर्शन घेतलें पाहिजे. या मंदिराच्या अलीकडे पूर्वीं बाजारपेठ असावी. आजहि उत्सवाच्या दिवसांत येथें दुकानांची गर्दी होते. म्हणूनच याला 'पेठेंतील मारुति' असें म्हणतात.


मारुति-मंदिराच्या पाठीमागें पिण्याच्या पाण्याचें तळें आणि समोर दिसणारी ती प्रशस्त भव्य इमारत 'श्रीधरकुटी'. अलीकडच्या काळांतील ही अलौकिक विभूति समर्थभक्तांचें, केवळ सज्जनगडाचेंच भूषण नसून, साऱ्या महाराष्ट्राचें - आणि कर्नाटकाचेंहि — भूषण म्हणतां येईल. त्यांच्या शिष्य-भक्तमंडळींनीं बांधलेली ही प्रचंड इमारत गडावरील आधुनिक वास्तूंत सहजच डोळ्यांत भरण्यासारखी आहे.

आतां सरळ समोर चालत जावयास हरकत नाहीं. प्राकाराच्या दरवाजांतून आंत शिरतांच समोर दिसतो तो मठ आणि त्याच्या उजव्या हाताला श्रीराम-मंदिर व समाधि-स्थान. थोडक्यांत असें म्हणतां येईल कीं, समोरच्या जुन्या वास्तूंत समर्थांच्या हयातींतील

चरित्र सांठवलें आहे; तर उजव्या बाजूला पसरलेला बहुतेक सर्व व्याप त्यांच्या समाधिकालानंतरचा आहे. तेव्हां कालानुक्रमानें पहावयाचें तर प्रथम मठांतच जाणें उचित.

हा मठ म्हणजे शिवछत्रपतींनीं समर्थांसाठीं बांधविलेली 'नूतन' इमारत. आज त्या 'नूतन' इमारतीचेंहि थोडें 'नूतनी'-करण समर्थ सेवा मंडळानें केलें आहे. तथापि तें केवळ वरच्या मजल्यापुरतें. खालचा सर्व भाग जुनाच आहे.

मठांत श्रीसमर्थांची निजण्याबसण्याची जी जागा ती शेजघर म्हणून ओळखली जाते. म्हणजे येथें प्रत्यक्ष श्रीसमर्थ-दर्शनच घडावयाचें आहे. तेव्हां साहजिकच ठेंगण्या दरवाजांतून आंत शिरतांना अगदीं नमून यावें लागेल. डाव्या हाताला जाळीचा दरवाजा दिसतो तें प्रत्यक्ष शेजघर. समर्थांनीं अखेरचे दिवस येथेंच घालविले आणि येथेंच ते श्रीरामस्वरूपीं विलीन झाले. शिवाजी महाराजांनीं त्यांना दिलेला पलंग येथें आहे. छत्रपतींच्या निधनानंतर या महापुरुषानें या पलंगावर बसूनच अनेक दिवस भावी अनर्थपात टाळण्याच्या विचारांत घालविले. येथूनच या थोर राष्ट्रगुरूनें आपल्या प्रिय मराठी भूमीला आणि साऱ्या भारतवर्षाला एक खूणगांठ (संभाजी महाराजांना अकरा वचनें) सांगून ठेवली :




नूतन इमारत किंवा मठ

" श्रीकार्यासीं अतितत्पर ऐशा पुरुषांच्या योगें
धर्मवृद्धि आहे. धर्मवृद्धिनें राज्यवृद्धी आहे. "

या ठिकाणीं बसूनच त्यांनीं शिवछत्रपतींबरोबर स्वराज्यवृद्धीचे व परसत्तेच्या विनाशाचे अनेक मनसुबे केले असतील. तो काळ महाराष्ट्राच्याच नव्हे, तर साऱ्या हिंदुस्थानाच्या दृष्टीनें महद्‌भाग्याचा होता. स्वातंत्र्यसूर्याचा प्रकाश महाराष्ट्रांत फांकलेला होता. आणि स्वातंत्र्याच्या उदयगीताचे उद्‌गाते नि प्रणेते शिव-समर्थ साक्षात् या काळीं सज्जनगडावर वावरत होते. महाद्वाराजवळील शिलालेखांत म्हटल्याप्रमाणें खरोखरीच त्या काळच्या सज्जनगडाच्या 'दारांतून साक्षात् ऐश्वर्य डोकावत होतें !'

सदानंदीं उदो जाला । सुखसंतोष फावला ।
पराधीनता गेली । सत्ता उदंड चालली ॥

असा तो काळ होता. नेटका प्रपंच नि उत्कट परमार्थ हीं साहचर्यानें तेथें नांदत होतीं. ' नभामाजि तारांगणें तैसे लोक ' समर्थांपाशीं जमत होते. ' तेथें येश कीर्ती प्रतापें । सीमा सांडिली ' होती. ' बहुत जनांस चालवी । नाना मंडळें हालवी । ऐसी हे समर्थ पदवी ' । समर्थांना यथार्थतेनें व आपोआपच प्राप्त झालेली तेथें दिसत होती.


भीमस्वामींनीं काढलेलें चित्र

या शेजघरांतच समर्थांच्या अनेक वस्तु नीट राखून ठेवलेल्या आहेत. कुबडी, काठी, गुप्ती व वांकडा सोटा हीं एका लाकडी चौकटींत अडकवलेली आहेत. काठीची उंची सहा फुटांहून अधिक आहे. कांखेत धरण्याची कुबडी तर त्यांच्या उंचीची सहज कल्पना देऊं शकेल. गुप्तींत शिवछत्रपतींनीं अर्पिलेली तलवार आहे. वांकडा सोटा गोरक्षनाथांनीं दिलेला म्हणून आहे.


श्रीसमर्थ वापरीत तो तांब्या व लोटा येथेंच आहे. त्यांना खोकल्याची व्यथा जडल्यापासून त्यांनीं विडा खाण्यास सुरुवात केली. त्यासाठीं विड्याच्या पानांचा डबा आणि पिकदाणीहि अर्थातच आली. या दोन्ही वस्तु येथें आहेत. याशिवाय त्यांचें वल्कल व फेटाहि ठेवलेला आहे.

शिवाजी महाराजांनीं त्यांना अर्पण केलेला पितळी खुरांचा पलंगहि तेथें असून त्यावरच त्यांच्या काळांत भीमस्वामींनीं काढलेली त्यांची तसबीर (चित्र) आहे. समर्थांचें हेंच चित्र अधिकृत व विश्वसनीय म्हणून समजलें जातें.

पलंगाशेजारीं दोन प्रचंड हांडे दिसतात. यांतून कल्याणस्वामी खालीं दीड मैल पायथ्याशीं असलेल्या उरमोडींतून समर्थांच्या स्नानासाठीं पाणी भरून आणीत. या हांड्यांवरून त्या शिष्योत्तमाच्या भीमकायेची सहज कल्पना येऊं शकेल.

पलंगापाशीच अग्निकुंड आहे. श्रीसमर्थ नित्य अग्निकार्य करीत त्याची ही खूण. त्यांतला अंगारा समर्थ आर्तांना रोगनिवारणासाठीं देत. आजहि तेथून शनिवार - गुरुवारीं अंगारा नेण्याची प्रथा आहे.

शेजघरांत डाव्या हाताला तंजावराहून आणविलेल्या रामाच्या मूर्तीसाठीं केलेलें सिंहासन आहे. तसेंच समर्थकालीन पूजेंतील हनुमान मूर्तीहि आहे. या सिंहा-




श्री राममंदिर

सनासमोरच समर्थांनीं देह ठेवला ती जागा फरसबंद केलेली आहे. येथें 'त्यांची काया गेली' आणि ते 'जगदाकार' होऊन राहिले, तेथपर्यंतचा इतिहास समाप्त झाला. त्यानंतरचा इतिहास घडला नि घडत आहे तो या इतिहासकालीन पुण्यपावन वास्तूच्या उत्तरेला.

राममंदिराच्या सन्निध समोर येऊन उभें राहिलें कीं, 'भव्यरूप वितंड। भीममूर्ति महा प्रचंड।' अशा गजाननाचें शुभदर्शन होतें. त्याच्याच मागें समर्थांचा नव्हे सकल 'रामदासां'-चाच सखा नि पाठीराखा हनुमान उभा आहे. मात्र हें ध्यान रामासमोरचें असल्यानें दासमारुतीचें -- हात जोडलेलें -- आहे. अर्थातच हें समर्थानंतरच्या काळांतील आहे हें उघडच आहे. प्रशस्त सभामंडप ओलांडून पुढें आलें कीं, वर पायऱ्या चढून रामदर्शनासाठीं जातां येतें; आणि खालीं पायऱ्या उतरून समर्थदर्शन घेतां येतें.

'खालीं समर्थ वर रामाच्या मूर्ति।' असें वर्णन एका जुन्या लोकगीतांतहि आलेलें आहे. येथील पद्धतीप्रमाणें प्रथम श्रीरामरायांचें दर्शन घेतलें पाहिजे. आंत अगदीं जवळ जाऊन या मनोरम मूर्ति निरखतां येतील.

राम व लक्ष्मण कोदंडधारी आहेत. डाव्या हांतात धनुष्य धरलेलें आणि उजवा हात शरसज्ज असलेला. मान थोडी उजवीकडे झुकलेली; किंचित् हास्यमुद्रा. असें हें मोठें आकर्षक ध्यान आहे.



श्रीरामाची मूर्ति

आपंगिलें मज श्रीरामसमर्थें !
ब्रह्मांड पालथें घालूं शके ॥
वक्रदृष्टीं पाहातां करील त्याचा घोट।
काळाचेंहि पोट फाडूं शके ॥

अशी ग्वाही समर्थांनीं स्वानुभवपूर्वक

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. १५४७४८.
क्रमांक ७५९७६ दि. ...

दिली आहे. तिचा विश्वास या ध्यानावरून सहज पटूं शकतो. भक्तजनांना आश्रयाचें आश्वासन नि संरक्षणाचें संजीवन देत नित्य उभ्या असलेल्या ह्या रघुकुलोत्तमाच्या वीरमूर्तीपुढें उभें रहावें आणि प्रभातकाळच्या प्रसन्न वातावरणांत खणखणीत आवाजांत निःसंकोच म्हणावें :

घनःश्याम हा राम लावण्यरूपी । महाधीर गंभीर पूर्णप्रतापी ।
करी संकटीं सेवकाचा कुडावा । प्रभाते मनीं राम चिंतीत जावा ।

श्रीरामाच्या वामांगीं सीतामाई उभी आहे आणि उजव्या बाजूला लक्ष्मण व त्यापलीकडे मारुति. या चारहि मूर्ति समर्थकालीन आहेत. समर्थ तंजावरला गेले असतां एका आंधळ्या कारागिराला दृष्टि देऊन त्या त्यांनीं करवून घेतल्या. त्यांच्या देहावसानापूर्वी केवळ चारच दिवस त्या गडावर येऊन पोहोंचल्या. आणि मूर्तीचें ध्यान आपण सांगितलें तसें आहे असें पाहून त्यांना समाधान लाभलें. प्रथम शेजघरांत, नंतर शिष्यांनीं बांधलेल्या लहान देवळांत, त्यापुढें संभाजी महाराजांनीं बांधविलेल्या मोठ्या मंदिरांत, तदनंतर मोगलांची टोळधाड आली असतां वासोटयाच्या किल्ल्यावर आणि पुनश्च राजाराम महाराजांच्या कारकीर्दीत उभारलेल्या मुख्य मंदिरांत असें या मूर्तीचें स्थलांतर झालेलें आहे या धातूच्या मूर्ति चलित असून वर्षांतून दोन-तीन प्रसंगीं उद्वार्चनाच्या वेळीं त्या बाहेर आणून स्वच्छ करण्याची पद्धत आहे.


या चार मूर्तींशिवाय रामाच्या देव्हाऱ्यांत समर्थांचीहि एक सुंदर धातुमूर्ति आहे; परंतु ती अलीकडील शंभर वर्षांतील असल्याचें समजतें. ही समर्थांची मूर्ति मारुतीसमोर रामरायांच्या डाव्या बाजूला आहे.

श्रीरामाच्या गाभाऱ्यांतूनच खालीं समाधीकडे जावयाला भिंतीतील दगडी जिन्याचा मार्ग आहे. आंत अंधार असला तरी वाट नित्य वहिवाटीची असल्यामुळें निर्धोक खालीं जावयास हरकत नाहीं.

खालीं येतांच आपण येतों ते श्रीसमर्थांच्या नेमके समाधीपुढें. सज्जनगडावर येऊन ज्याचें दर्शन घेऊन कृतार्थ व्हावयाचें तें हें परमरमणीय नि सर्वदा स्मरणीय स्थान. येथेंच त्या महान् राजकारणी संताचा नि अध्यात्माच्या अत्युच्च शिखरावर पोहोंचलेल्या राजगुरूचा पांचभौतिक देह पंचतत्त्वांत विलीन झाला.

समाधीच्या गाभाऱ्याबाहेरच्या चौकटींत उभें राहून समाधीचें दर्शन घेतांच कोणाच्या डोळ्यांसमोर सारा वैभवशाली इतिहास उभा रहातो; आणि जे भक्तिभावानें आलेले असतील त्यांना सद्गुरु-दर्शनाचें सुख लाभतें. शांत, गंभीर, पवित्र असें येथलें सारें वातावरण मनाला पुष्कळ उंच घेऊन गेल्याशिवाय रहात नाहीं. आपोआपच करसंपुट जुळतें आणि सराव असलेल्या वाणींतून शब्द उमटतात :

शुकासारखें पूर्ण वैराग्य ज्याचें । वसिष्ठापरी ज्ञान योगेश्वराचें ।
कवि वाल्मिकासारिखा मान्य ऐसा । नमस्कार माझा सद्गुरु रामदासा ।।



श्रीसमर्थ-समाधि

समाधीच्या पार्श्वभागीं पितळी पेटींत पादुका आहेत. त्या श्रीदत्तात्रेयांनीं समर्थांना दिल्याचा उल्लेख आहे. या पादुका येथून कधींहि हालविल्या जात नाहींत. संचारासाठीं नेल्या जातात त्या पादुका वेगळ्या आहेत.

समाधीच्या चिऱ्याला उभी मोठी भेग समाधी-स्नानापूर्वी उघडी दिसते. समर्थांच्या निर्याणप्रसंगीं कल्याण स्वामी तेथें नव्हते. ते नंतर येऊन

गुरुमाउलीच्या समाधीपाशीं धरणें धरून बसले तेव्हां समर्थांनीं त्यांना साक्षात् दर्शन दिलें, त्याची खूण म्हणून सांगितली जाते.

समाधीचें दर्शन घेऊन मंदिराबाहेर पडावें आणि प्रदक्षिणेला निघावें. मंदिराच्या मागील बाजूस नैर्ऋत्य कोपऱ्यांत एक मारुति-मंदिर असून वायव्येकडील कोपऱ्यांत वेणाबाईचें वृंदावन आहे. शके १६०० मध्यें चैत्र अमावास्येला समर्थशिष्या वेणाबाईनीं—

वोपूनि विणा तो सद्गुरुकरीं । वाहूनि मस्तक पदाब्जावरी ।
प्राणज्योतीतें काढूनि झडकरी । सद्गुरुहृदयीं मिळविली ॥

रामनामाचें संकीर्तन करतां करतांच या गुरुचरणीं विलीन झाल्या. मिरजेच्या मठाचें आधिपत्य समर्थांनीं यांच्याकडे दिलें होतें. सध्या वृंदावन दिसतें तेथेंच त्यांचा अंत्यसंस्कार झाला. तेथें कांहीं काळ चंपकवृक्ष डुलत होता. अलीकडे या समाधीवृंदावनावर स्वतंत्र मंडपहि उभारला गेला आहे.

समर्थांच्या दुसऱ्या प्रमुख शिष्या आक्काबाई. समर्थांच्या पश्चात् यांनींच समर्थ-संस्थांचा कारभार कुशलतेनें चालविला. समर्थांनंतर ४० वर्षांनीं शके १६४३ मध्यें कार्तिक शुद्ध प्रतिपदेला सज्जनगडावरच आक्कांचा देहान्त झाला. त्यांची समाधि राममंदिरापुढील भागांत उत्तर दिशेला आहे. येथें आतां समर्थ सेवा मंडळानें प्रचंड सभागृह व इतर इमारती उभारल्या असून तें स्थान मोठें रमणीय झालें आहे.

समर्थांच्या या दोन्ही शिष्या फार थोर योग्यतेच्या होत्या.

आक्काबाई वेणूबाई । समर्थांच्या लागती पाई ॥
देवरूपी केल्या ठाई । दूरवर त्यांची केवढी कीर्ती ॥

अशी त्यांची थोरवी तत्कालीन लोकगीतांतून गाइलेली आहे.

मंदिरासमोर आज जें अशोकवन दिसतें तेथें पूर्वीं तळें होतें. त्याच आवारांत दिवंगत मठाधिपतींच्या समाध्या आहेत.

अलीकडे सात-आठ वर्षांत सज्जनगडावर समर्थ सेवा मंडळानें जीर्णोद्धाराचीं अनेक कामें केलीं आहेत. मठाचा जीर्णोद्धार, वेणाबाई-आक्काबाई यांच्या समाधि-वृंदावनांवरील इमारती, यात्रेकरूंच्या सोयी-साठीं बांधलेल्या उत्तरेकडील खोल्या, स्त्रीधर्मशाळा अशा अनेक इमारतींचा उल्लेख या दृष्टीनें करतां येईल. किंबहुना मध्यंतरीं आलेलें औदासिन्य दूर करून नवा जोम व नवा उत्साह मंडळाच्या प्रशंसनीय कामगिरीमुळें गडावर संचारूं लागलेला दिसतो. त्यामुळें प्रतिवर्षीं दर्शनासाठीं येणारांची संख्या वाढतच असलेली दिसते. उत्सवांतील यात्राहि वाढती आणि त्याची भव्यता व व्यवस्थितपणाहि वृद्धिंगत होतांना दिसत आहे.

## ५. नित्यक्रम व उत्सव

पहाटेला काकडआरतीची घंटा खणखणते. तेव्हांपासून नित्य पूजा-अर्चेला प्रारंभ होतो. षोडषोपचार पूजा सकाळीं ९–१० वाजे-पर्यंत आटोपते, तरी आरती व्हायला मध्यान्हाची वेळ होतेच. सकाळीं पूजेच्या वेळीं समाधि उघडी पहायला सांपडते. नंतर वस्त्रें, मेखला इत्यादि घातल्यावर समाधीची शोभा कांहीं आगळीच दिसूं लागते. नैवेद्य झाल्यावर गडावर आलेल्या यात्रेकरूंना भोजन-प्रसाद मिळतो.

सायंकाळीं सूर्यास्तापूर्वींच अष्टकांना प्रारंभ होतो.

अनुदिनि अनुतापें तापलों रामराया ।
परमदिनदयाळा नीरसी मोहमाया ॥

असा प्रारंभ होतांच भाविक हृदय हळहळू तन्मय होऊं लागतें. अशीं अष्टकें तेथें बसून सामुदायिकपणें व तन्मयतेनें म्हणण्याचा अनुभव ज्यांनीं घेतला त्यांनाच त्याची प्रेममाधुरी कळेल. समोरील

रामरायाच्या सगुणमूर्तींतून करुणेचे पडसाद अनुभवायला त्यांनाच मिळतील. नाहीं तर –

पुढें पाहतां सर्वही कोंदलेसें । अभाग्यासि हें दृश्य पाषाण भासे ॥

करुणाष्टकें, सवाया इत्यादि झाल्यानंतर भजन सुरू होतें तें आरती संपेपर्यंत चालतें. सायंपूजा, आरती आटोपल्यावर रात्रीं ९॥-१० च्या सुमारास मनाचे श्लोक, दासबोधवाचन झाल्यावर शेजारती होते आणि दिवसाचा नित्य कार्यक्रम संपतो.

गडावरील प्रतिवार्षिक कार्यक्रमांत दासनवमीचा उत्सव हा मुख्य. माघ वद्य प्रतिपदेपासून सुरू होणारा हा उत्सव नवमीच्या रात्रीपर्यंत चालतो. ३०–४० हजार तरी यात्रा गडावर या दिवसांत जमते. नवमीला समर्थांच्या पुण्यतिथीचा दिवस. त्यामुळें त्या दिवशीं गडावर अलोट गर्दी होते.

त्यानंतर लगेच महाशिवरात्रीलाहि गड माणसांनीं फुलून निघतो. पण तो मुख्यतः गडाच्या आसमंतांतील खोऱ्यांतून जमणाऱ्या खेडूत मंडळींनीं.

याशिवाय गडावर साजरा होणारा प्रमुख उत्सव म्हणजे रामनवमीचा. परंतु रामनवमीचा खरा मोठा उत्सव असतो चाफळला.

• • •

श्रीसमर्थांच्या पदधूलीनें परमपावन झालेल्या या पर्वतप्रदेशाची परममहात्मता खरोखर शब्दातीत आहे. तथापि अलीकडच्या काळांत सज्जनगडावर आल्यानंतर ज्या महान विभूतींचें स्मरण होणें अपरिहार्यच आहे, त्यांच्या शब्दांतून सज्जनगडाचें माहात्म्य वाचावयास मिळणें हें सोन्याला सोनचाफ्याचा सुगंध लाभण्याइतकेंच अपूर्व.

श्रीसमर्थांच्या तेजस्वी परंपरेंतून सज्जनगडावर उत्पन्न झालेली ही देदीप्यमान विभूति म्हणजे भगवान् श्रीमत् परमहंस परिव्राजकाचार्य

श्रीधरस्वामी महाराज. वैराग्याची धगधगीत ज्योत आणि शांतिप्रेमाची दुथडी भरून वाहून वहाणारी ही गंगा श्रीसमर्थांच्या खडतर सेवा-साधनेंतूनच उगम पावलेली आहे. श्रीस्वामी महाराज सज्जनगडाचें माहात्म्य स्वानुभवपूर्वक सांगतात. :

" श्रीसज्जनगड म्हणजे अलोट दैवी सामर्थ्याचें परमपावन स्थळ आहे. हें परमार्थाचें अधिष्ठान आहे. इथे ' गुह्यात्गुह्यतरं नित्यं ' असें आत्मज्ञान प्राणिमात्राला मिळतें. आजपर्यंत इथें तप करून पुष्कळ ' प्राप्त पुरुष ' बनले आणि कृतकृत्य झाले.



भगवान् श्रीमत् प. प. श्रीधरस्वामी

(येथें) सर्व सामर्थ्याची (समर्थांची) ती तेजस्वी मूर्ति डोळ्यांपुढें प्रकाशूं लागते. खरोखरच ती मूर्ति डोळ्यांपुढें आल्यानंतर कसल्याहि मनुष्याला त्या धर्मोद्धारकाच्या नि देशोद्धारकाच्या प्रचंड शक्तीचा साक्षात्कार क्षणभर तरी झाल्याशिवाय रहाणार नाहीं. आपल्या या अलोट सामर्थ्यानिशीं श्रीसमर्थ अजून सुद्धां या सज्जनगडावर विशेषरूपानें वास करीत आहेत. "

॥ जय जय रघुवीर समर्थ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ७५९७६ वि. श्रीमदास
५०२ 22/3/09

# सांस्कृतिक भारत दर्शन

## पहिला संच : पांच पुस्तकें : ४ रुपये

१. जागृत जगन्नाथ
   जगन्नाथपुरी

२. क्षिप्रेच्या सोनेरी स्मृति
   उज्जयिनी

३. त्रिभुवनेश्वर लिंगराज
   भुवनेश्वर

४. भगवान कोणादित्य
   सूर्यक्षेत्र कोणार्क

५. श्रीचैतन्य-लीलाधाम
   नवद्वीप

आसेतुहिमाचल पसरलेल्या विशाल
भारतभूमींतील संस्कृति - केन्द्रांचा
सविस्तर, साधार, सचित्र परिचय.
पन्नास पुस्तकांचा विराट् संकल्प

वोरा अँण्ड कंपनी पब्लिशर्स प्रा. लिमिटेड, मुंबई २

REFBK-0015049




पंढरपूर–पांडुरंग; **सज्जनगड** – रामदासस्वामी, **आळंदी** – ज्ञानेश्वर; **पैठण** – एकनाथ; **जेजुरी** – खंडोबा; **देहू** – तुकाराम; **त्र्यंबकेश्वर-नाशिक** – श्रीराम; **चिंचवड** – मोरया गोसावी; **कोल्हापूर** – महालक्ष्मी; **औदुंबर-नरसोबाची वाडी** – दत्तात्रय; **तुळजापूर**–भवानी; **नेवासें**–मोहिनीराज, ज्ञानेश्वर; **कवळें**–शांतादुर्गा; **मंगेश**–शंकर; **भीमाशंकर** – ज्योतिर्लिंग; **परशुराम** – परशुराम; **शिखर-शिंगणापूर** – शिवाजी; **हरिहरेश्वर** – पेशवे; **गाणगापूर** – नरसिंह सरस्वती; **माहूर** – दत्त, देवी; **आंबे जोगाई**– देवी; **औंढ्या नागनाथ** – ज्योतिर्लिंग; **परळी वैजनाथ** – ज्योतिर्लिंग; **वेरूळ** – लेणी, ज्योतिर्लिंग; **नांदेड** – गोदावरी; **बीड** – कंकालेश्वर; **रामटेक** – सीता-राम; **सालबर्डी** – यात्रा; **अमरावती** – अंबादेवी; **मुक्तागिरी** – जैन-क्षेत्र; **चांदा** – महाकाली; **शेगांव** – गजानन महाराज; **कौंडिण्यपूर** – पांडुरंग; **कळम्ब** – चिंतामणी; **दक्षिणद्वार देवगिरी** – दौलताबाद.

• • •